पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/प्रवे बंदी/ /२०२४ दिनांक - /०८/२०२४

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दि.१७/०८/२०२४ रोजी श्री शिवछत्रपती क्रिडा संकुल, महाळुंगे, बालेवाडी येथे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे उपस्थितीत 'मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजना' उद्घाटन समारंभ कार्यक्रमास उपस्थित रहणार आहेत. सदर कार्यक्रमाकरीता मा. उपमुख्यमंत्री (गृह), महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच पिंपरी चिंचवड, पुणे शहर व पुणे ग्रामीण भागातून महिला, पुरुष, अनेक राजकीय व्यक्ती मोठ्या प्रमाणात आपले खाजगी तसेच सरकारी वाहनांनी येणार आहेत. कार्यक्रमाकरीता येणारे महिला व पुरुष हे अंदाजे ८०० ते ९०० बसमधून येणार असल्याने सदर बसेसची मुंबई बेंगलोर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ राहणार आहे. त्यातच मुंबई बेंगलोर महामार्गावर जड अवजड वाहनांची देखील वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने सदर महामार्गावर प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मुंबई बेंगलोर महामार्गावर जड अवजड वाहतूकीस सदर कार्यक्रमादिवशी प्रवेश बंदी करणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### हिंजवडी, तळेगाव, चाकण, वाकड, बावधन, देहूरोड वाहतूक विभाग

१. मुंबई बेंगलोर महामार्गावरुन चांदणी चौक ते उर्से टोलनाका दरम्यान येण्यास जाण्यास (अत्यावश्यक सेवेतील व प्रवासी वाहने तसेच कार्यक्रमाकरीता येणाऱ्या वाहनांना वगळून) सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

२. चाकण वरुन पिंपरी चिंचवड मार्गे बेंगलोर महामार्गावर येण्यास (अत्यावश्यक सेवेतील व प्रवासी वाहने तसेच कार्यक्रमाकरीता येणाऱ्या वाहनांना वगळून) सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

३. पुणे बाजूकडून मुंबई बेंगलोर महामार्गावर येण्यास (अत्यावश्यक सेवेतील व प्रवासी वाहने तसेच कार्यक्रमाकरीता येणाऱ्या वाहनांना वगळून) सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

४. तळेगाव, देहुरोड मार्गे मुंबई बेंगलोर महामार्गावर येण्यास (अत्यावश्यक सेवेतील व प्रवासी वाहने तसेच कार्यक्रमाकरीता येणाऱ्या वाहनांना वगळून) सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

सदर अधिसुचनेची अंमलबजावणी दिनांक १७/०८/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. ते रात्रौ २०.०० वाजेपावेतो अमलात राहील.

( विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

Scanned with OKEN Scanner

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **हिंजवडी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड

२/- अधिसुचनेचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींक करून वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक लावावे.

४) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर,

५) मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण

६) मा. पोलीस अधिक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, पुणे विभाग

/- सदर अधिसुचनेप्रमाणे जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी होणेकरीता अधिसुचना निर्गमित होवून प्रवेश बंदी करणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner